# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः15.10.2024** **वारःमंगळवार**

---

1. पंतप्रधानांच्या हस्ते आज आंतरराष्ट्रीय मानकीकरण अधिवेशनाचं तसंच 8व्या भारत मोबाईल काँग्रेसचं उद्घाटन
2. SCOच्या परिषदेत सहभागी होण्यासाठी परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ एस जयशंकर आजपासून दोन दिवसांच्या इस्लामाबाद दौऱ्यावर
3. भारताकडून कॅनडाच्या उच्चायुक्तांची आणि राजनैतिक अधिकाऱ्यांची हकालपपट्टी
4. पुणे मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्यातील रेल्वे मार्गिकांच्या कामांना महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाची मान्यता आणि
5. महिलांच्या टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारताचं आव्हान संपुष्टात

**<u>पीएमआयटी</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत भारत मंडपम इथं आयोजित ITU-WTSA म्हणजेच आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघटनेच्या आंतरराष्ट्रीय मानकीकरण अधिवेशनाचं उद्घाटन करणार आहेत. याच कार्यक्रमात पंतप्रधानांच्या हस्ते 8 व्या भारत मोबाईल काँग्रेसचं देखील उद्घाटन होणार आहे. आयटीयू ही संयुक्त राष्ट्रांची डिजिटल तंत्रज्ञानाशी संबंधित संघटना असून तिच्या प्रशासकीय परिषदेचं दर चार वर्षांनी हे अधिवेशन आयोजित केलं जातं. भारतानं प्रथमच या अधिवेशनाचं आयोजन केलं असून ते हिंद-प्रशांत क्षेत्रात आयोजित केलं जाण्याचीही ही पहिलीच वेळ आहे. या अधिवेशनात या उद्योगातील जागतिक पातळीवरचे तीन हजारांहून अधिक आघाडीचे उद्योजक, धोरणकर्ते, 190 हून अधिक देशांमधील दूरसंचार, डिजिटल आणि आयसीटी विषयातील तज्ज्ञ प्रतिनिधी सहभागी होतात. WTSA 2024 च्या माध्यमातून त्यांना 6G, AI, IoT, बिग डेटा, सायबर सुरक्षा वगैरेसारख्या अत्यंत महत्त्वाच्या यापुढील काळातील तंत्रज्ञानावर चर्चा करण्यासाठी आणि त्यांची भविष्यातील दिशा ठरवण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिलं जाईल. तर भारत मोबाईल काँग्रेसमध्ये आघाडीच्या दूरसंचार कंपन्यांनी आणि नवोन्मेषकांनी क्वांटम तंत्रज्ञानात तसंच चक्रीय अर्थव्यवस्थेत केलेली प्रगती अधोरेखित करणाऱ्या भारताच्या नवोन्मेषी परिसंस्थेचं दर्शन घडवण्यात येईल.

**<u>डॉ. चंद्रशेखर</u>**

भारताची वसुधैव कुटुंबकमची समृद्ध परंपरा जागतिक मानकांचा अंगिकार करण्यास वचनबद्ध असल्याचं केंद्रीय दूरसंचार राज्यमंत्री डॉक्टर पेम्मसानी चंद्रशेखर यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघटनेच्या जागतिक मानक चर्चासत्राच्या समारोप सत्रात ते काल बोलत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत सरकारनं तंत्रज्ञानाच्या माध्यमातून देशातील नागरिकांना जोडण्यासाठी डिजिटल इंडिया अभियानासारखे अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. देशातील सहा लाख म्हणजे जवळपास 95 टक्के खेडी 4G तंत्रज्ञानाद्वारे जोडली गेली आहेत, तसंच दोन लाख गावं आताच ऑप्टिकल फायबरद्वारे जोडण्यात आली असून उर्वरित गावं 2027 पर्यंत जोडली जातील असंही त्यांनी यावेळी सांगितलं.

**<u>कॅनडा-राजदूत</u>**

भारतानं कॅनडाचे विद्यमान उच्चायुक्त स्टुअर्ट रॉस व्हीलर यांच्यासह सहा राजनैतिक अधिकाऱ्यांची हकालपपट्टी केली आहे. यामध्ये उप उच्चायुक्त आणि वरिष्ठ सचिव पदावरील राजनैतिक अधिकाऱ्यांचा समावेश आहे. या सर्वांना 19 तारखेला किंवा त्यापूर्वी भारत सोडून जाण्यास सांगण्यात आलं आहे. याशिवाय भारतानं कॅनडातील आपल्या उच्चायुक्तांसह अन्य राजनैतिक

अधिकाऱ्यांनाही माघारी बोलावलं आहे. कॅनडातील विद्यमान सरकार  त्यांच्या सुरक्षेची काळजी घेण्याची बांधिलकी पाळेल याची खात्री नसल्यानं त्यांना माघारी बोलावण्यात येत असल्याचं भारतानं म्हटलं आहे. याच अनुषंगानं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं काल कॅनडाच्या भारतातील प्रभारींना बोलावून, कोणतंही कारण नसताना  कॅनडातील भारतीय उच्चायुक्तांसह इतर अधिकाऱ्यांना लक्ष्य करणं खपवून घेतलं जाणार नाही असं त्यांना कडक शब्दात सांगितलं. दहशतवाद आणि हिंसाचाराचं  वातावरण असताना ट्रूडो सरकारच्या काही कृतींमुळे भारतीय राजनैतिक अधिकाऱ्यांची सुरक्षा धोक्यात असल्याचंही भारतानं स्पष्ट केलं. त्याचबरोबर भारताच्या विरोधातील दहशतवाद, हिंसाचार आणि फुटीरतेला पाठिंबा देणं ट्रुडो सरकारनं यापुढेही सुरूच ठेवल्यास आणखी कठोर पावलं उचलण्याचा हक्क भारतानं राखून ठेवला असल्याचंही भारताच्यावतीनं कळवण्यात आलं.

**<u>SCO</u>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ एस जयशंकर शांघाय सहकार्य संघटना अर्थात SCOच्या परिषदेत सहभागी होण्यासाठी आजपासून दोन दिवसांच्या इस्लामाबाद दौऱ्यावर जात आहेत. या पाकिस्तान भेटीदरम्यान आपण विविध मुद्यांवरील बैठकांमध्ये सहभागी होणार असून पाकिस्तानबरोबर कोणत्याही विषयावर द्विपक्षीय चर्चा होणार नसल्याचं जयशंकर यांनी यापूर्वीच स्पष्ट केलं आहे. गेल्या 9 वर्षातील भारतीय परराष्ट्र मंत्र्यांचा हा पहिलाच पाकिस्तान दौरा आहे.

**<u>भारत-कोलंबिया</u>**

भारत आणि कोलंबिया यांच्यात आज नवी दिल्लीत दृक-श्राव्य कार्यक्रमांच्या सहनिर्मितीबाबत करार करण्यात येणार आहे. माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन आणि कोलंबियाच्या परराष्ट्र खात्याचे उपमंत्री जॉर्ज एन्रिके-रोखास रॉड्रिगेझ यांच्यासह दोन्ही देशांचे अन्य प्रतिनिधी या करारावर स्वाक्षरी करतील

**<u>अमित शहा</u>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज नवी दिल्लीत भारतीय पोलीस सेवेतील प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांशी संवाद साधणार आहेत. हे प्रशिक्षणार्थी अधिकारी त्यांचे प्रशिक्षण काळातील अनुभव गृहमंत्र्यांना सांगणार आहेत. तर देशाच्या अंतर्गत सुरक्षेपुढील आव्हानांना  कशाप्रकारे तोंड देता येईल याचं अमित शहा त्यांना मार्गदर्शन करतील. भारतीय पोलीस सेवेच्या 2023 च्या तुकडीत 54 महिला अधिकाऱ्यांसह एकंदर 188 अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

**<u>जेपीसी-बैठक</u>**

वक्फ दुरुस्ती विधेयकावर चर्चा करण्यासाठी या विषयावरील संयुक्त संसदीय समितीची काल नवी दिल्लीत बैठक झाली. तथापि या समितीचं नियमानुसार काम होत नसल्याचा आरोप करत विरोधी पक्षांच्या काही खासदारांनी या बैठकीवर बहिष्कार टाकला. काँग्रेसचे गौरव गोगोई, इम्रान मसूद, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अरविंद सावंत, AIMIM चे असदुद्दीन ओवेसी, डीएमकेचे ए. राजा यांचा यामध्ये समावेश आहे

**<u>स्वामी समर्थ</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना अक्कलकोटच्या श्री स्वामी समर्थांची प्रतिमा भेट देण्यात आली आहे. सरकार स्वामी समर्थांचा समाजाविषयीचा दृष्टिकोन प्रतक्षात आणण्याचा कायम प्रयत्न करत राहील, असं पंतप्रधानांनी या संदर्भात समाज माध्यमावर लिहिलेल्या संदेशात म्हटलं आहे.

**<u>राज्य मंत्रिमंडळ निर्णय</u>**

मुंबईतल्या पाच प्रवेश मार्गांवरील पथकर हलक्या वाहनांसाठी माफ करण्याचा निर्णय काल झालेल्या महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. आगरी समाजासाठी महामंडळाच्या स्थापनेसह, दमणगंगा-एकदरे-गोदावरी नदी जोड योजना तसंच सिंचनाशी संबंधित काही योजनांनाही यावेळी मान्यता देण्यात आली.

पुणे मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्यातील रेल्वे मार्गिकांच्या कामांना मान्यता, मराठी भाषेविषयी जनजागृतीसाठी पंधरवडा साजरा करण्याचा, तसंच महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाला पद्मविभूषण रतन टाटा यांचं नाव देण्याचा निर्णयही निर्णयही कालच्या या बैठकीत घेण्यात आला.

**अनुसंधान-राष्ट्रीय-संघटन**

अनुसंधान या राष्ट्रीय संशोधन संस्थेनं देशातील वैज्ञानिक संकल्पना आणि संशोधनातील विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवण्याच्या उद्देशानं पंतप्रधान प्रारंभिक कारकीर्द संशोधन अनुदान आणि इलेक्ट्रिक वाहनांच्या उत्पादनांना चालना देण्यासाठी इलेक्ट्रिक अभियानाची काल सुरुवात केली. या अभियानाअंतर्गत इलेक्ट्रिक वाहनांसाठी आवश्यक असलेल्या बॅटरी सेल, पॉवर इलेक्ट्रॉनिक्स, मशिन्स आणि ड्राईव्हज तसंच चार्जिंगसाठीच्या पायाभूत सुविधां उपलब्ध करुन देण्याला चालना दिली जाणार आहे.

**निधन**

आपल्या निखळ अभिनयानं रसिकांच्या मनाचा ठाव घेणारे हरहुन्नरी अभिनेते अतुल परचुरे यांचं काल मुंबईत निधन झालं. ते 57 वर्षांचे होते. प्रामुख्यानं विनोदी भूमिका साकारणाऱ्या अतुल परचुरे यांनी बालरंगभूमीपासून अभिनय क्षेत्रात पदार्पण केलं. परचुरे यांच्या पार्थिव देहावर आज सकाळी मुंबईत शिवाजी पार्क स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

**क्रिकेट**

महिलांच्या टी - ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारताचं आव्हान संपुष्टात आलं आहे. अ गटात काल झालेल्या सामन्यात न्यूझीलंडच्या संघाने पाकिस्तानचा पराभव करत उपान्त्य फेरीत प्रवेश केल्यानंतर भारतीय संघ चार गुणांसह तिसऱ्या स्थानावर राहीला. ऑस्ट्रेलिया पहिल्या तर पाकिस्तान चौथ्या स्थानावर आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.